महाराष्ट्र टाइम्स

# मोनोव्हील अॅम्ब्युलन्सला ग्रीन सिग्नल

Oct 17, 2014, 09.04AM IST

अनुपमा गुंडे, ठाणे

सर्पदंश होणाऱ्यांना तात्काळ उपचार मिळावेत आणि उपचार मिळेपर्यंत प्रथमोपचार व्हावेत, यासाठी ठाण्याच्या क्रायसिस फाऊंडेशनच्या सहकार्याने मोनोव्हील अॅम्ब्युलन्सचे सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या तत्त्वावर उत्पादन व वितरण करण्याचे आदेश मुंबई हायकोर्टाने आरोग्य विभागाला दिले आहेत. यासाठी कोर्टाच्यावतीने जमशेद मेस्त्री यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे.

सर्पदंशाने जिल्ह्यात व राज्यात विशेषतः पावसाळ्यात सर्पदंशामुळे वेळेत उपचार न मिळाल्याने मोठ्या प्रमाणावर मृत्यू होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी क्रायसिस फाऊंडेशनच्यावतीने मोनोव्हील अॅम्ब्युलन्स विकसित करण्यात आली होती. राज्यात व देशात सर्पदंशामुळे होणाऱ्या मृत्यूची आकडेवारीही फाऊंडेशनने कोर्टापुढे सादर केली होती. फाऊंडेशनच्यावतीने अपूर्वा आगवण, डॉ. सरिता पारीख, क्लोरा कोपील आणि ग्लेन फर्नांडिस यांनी हे संशोधन केले होते. राज्यातील संर्पदंशामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी आरोग्य विभागाने क्रायसिस फाऊंडेशनसोबर काम करावे, असेही न्यायमूर्ती व्ही. एम. कानडे आणि पी. डी. कोदे यांनी म्हटले आहे.

**काय आहे मोनोव्हील?**

सर्पदंश झालेल्या पेशंटला हॉस्पिटलपर्यंत पोहोचवू शकण्यास उपयुक्त ठरेल, अशी ही मोनोव्हील यंत्रणा आहे. विषारी सर्पाने दंश उपचारासाठी या मोनोव्हीलवर मॅन्युअल व अॅटोमॅटिक अशा दोन्ही स्वरूपाच्या व्हेंटिलेटरची सोय आहे. या व्हिलसोबतच सापाला पकडण्यासाठीच ट्रप, स्पेशल बूट व पिनॉक ही आयुर्वेदिक गोळी या कीटचाही समावेश आहे.